**प्रेसनोट दि. ०८/०६/२०१९**

**फरासखाना पोलीस स्टेशन,पुणे शहर**

**हरविलेले पाकीट पैसे व कागदपत्रे पोलीसांनी केले परत.**

फरासखाना पोलीस स्टेशन अंकीत गणेश पेठ पोलीस चौकी येथे दिनांक ०७/०६/२०१९ रोजी गणेश पेठ बीट मार्शलकडील कर्मचारी रविंद्र दहातोंडे व सचिन सरपाले यांना पेट्रोलींग दरम्यान दगडीनागोबा मंदीर येथे सार्वजनिक रस्त्यावर एक बेवारस पाकीट पडलेले मिळुन आले. त्यांनी सदर पाकीटाची पाहणी केली असता त्यमध्ये इसम नामे अनिल बिडकर यांचे आधारकार्ड, ड्रायव्हींग लायसन्स, पॅनकार्ड, ए.टी.एम कार्ड तसेच ४०००/- रुपये रोख असे मिळुन आले. त्यावेळीस अनिल बिडकर याचा आधारकार्ड ३०३ गणेश पेठ, पुणे असा पत्ता नमुद होता. सदर इसमाची खात्री करण्याकरीता पोलीस कर्मचारी सचिन सरपाले व रविंद्र दहातोंडे असे वर नमुद पत्त्यावर जावुन इसम नामे अनिल बिडकर यांचेबाबत चौकशी केली असता सदर नावाचा इसम हा तेथेच राहत असलेबाबत माहीती प्राप्त झाली. त्यानंतर थोड्या वेळात सदर नावाचा इसम मिळुन आला. त्याचेकडे त्याचे पाकीटाबाबत व त्यामध्ये असलेले कागदपत्रे व पैस याबाबत खात्री करुन, ते पाकीट त्याचे असल्याची खात्री झाल्याने , सदरचे पाकीट त्यांचे ताब्यात देण्यात आले. त्यावेळी त्यांनी वर नमुद पोलीसांना मिठाईचा बॉक्स देवुन, पोलीस दलाचे आभार मानले आहे.

सदरची कामगिरी श्री किशोर नावंदे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक फरासखाना पोलीस स्टेशन, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस शिपाई रविंद्र दहातोंडे, पोलीस शिपाई सचिन सरपाले यांनी केली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे शहर